पानशेत पूरग्रस्त सहकारी सोसायट्यांना भाडेपट्ट्यांनी देण्यात आलेल्या जमिनी मालकी हक्काने देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एफएलडी-२०१९/प्र.क्र.०३/र-१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०८ मार्च, २०१९

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएफएल-३४८५/३१०६९०/प्र.क्र.१५/म-११, दि.१२.८.१९८७
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएफएल-१३४८९/प्र.क्र.२४०६/म-११, दि.१५.४.१९९१
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएल-०४/२०१३/प्र.क्र.७५/म-११, दि.२१.११.२०१३
४) शासन शुध्दीपत्र, महसूल व वन विभाग क्र.सीएलएल-०४/२०१३/प्र.क्र.७५/म-११, दि.३१.३.२०१५

<u>प्रस्तावना :-</u>

पुणे शहरात जुलै-१९६१ मध्ये पानशेत पुरामुळे झालेल्या दुर्घटनेनंतर पुणे शहर व त्याच्या परिसरातील बरीच कुटुंबे बेघर झाली. पानशेत पूरग्रस्तांसाठी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन ९९ वर्षाच्या भाडेपट्ट्याने भुखंड प्रदान करण्यात आले. सदर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या नावे जमिनीची मालकी नसल्याने, गृहनिर्माण संस्थेतील सभासदांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. त्यांना मालमत्तेवरील कर्जाचा लाभ घेता येत नाही, मालमत्ता गहाण ठेवता येत नाही, मालमत्ता शासनाच्या परवानगीशिवाय विकता येत नाही. यास्तव पानशेत पूरग्रस्त सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्याने दिलेल्या जमिनी मालकी हक्काने देण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

पुणे शहरातील पानशेत पूरग्रस्त १०३ सहकारी गृहनिर्माण संस्थांना भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या जमिनी मालकी हक्काने देण्याबाबत खालीलप्रमाणे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

(१) जे मूळ पूरग्रस्त आहेत त्यांच्या प्रकरणी, दि.१.२.१९७६ रोजीची जमिनीची किंमत, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली ठरविण्यात यावी व जमिनीच्या किंमतीवर, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन-०८/२०१२/प्र.क्र.६४/ज-१,

दि.२६.११.2012 अन्वये विहित केलेल्या व्याज दरानुसार व्याजाची आकारणी करण्यात यावी, जमिनीची किंमत व येणाऱ्या व्याजाची रक्कम आकारण्यात यावी.

(२) ज्या प्रकरणात अधिकृत पूरग्रस्त व्यक्तिने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी घेऊन अधिकृतरित्या त्याचा भूखंड हस्तांतरित केला आहे, त्या प्रकरणात दि.१.२.१९७६ रोजीची जमिनीची किंमत, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सल्ल्याने ठरविण्यात यावी व जमिनीच्या किंमतीवर, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन-०८/२०१२/प्र.क्र.६४/ज-१, दि.२६.११.२०१२ अन्वये विहित केलेल्या व्याज दरानुसार व्याजाची आकारणी करण्यात यावी. अशा प्रकरणात जमिनीची किंमत व येणाऱ्या व्याजाची रक्कम या एकूण रक्कमेच्या ५०% रक्कम जादा आकारण्यात यावी.

(३) ज्या प्रकरणात अधिकृत पूरग्रस्त व्यक्तिने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परवानगी न घेता अनधिकृतरित्या भूखंड हस्तांतरित केला आहे, त्या प्रकरणात दि.१.२.१९७६ रोजीची जमिनीची किंमत, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली ठरविण्यात यावी व जमिनीच्या किंमतीवर, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन-०८/२०१२/प्र.क्र.६४/ज-१, दि.२६.११.२०१२ अन्वये विहित केलेल्या व्याज दरानुसार व्याजाची आकारणी करण्यात यावी. अशा प्रकरणात जमिनीची किंमत व येणाऱ्या व्याजाची रक्कम या एकूण रक्कमेच्या १००% रक्कम जादा आकारण्यात यावी.

(४) जे भूखंड धारक भूखंडाचा वापर वाणिज्य स्वरुपाचा करीत असतील, त्या प्रकरणात अशा वापरातील बदल नियमानुकूल करण्यासाठी अशा भुखंडाचे प्रचलित ASR मधील दराने निवासी प्रयोजनासाठी येणारे मुल्यांकन व वाणिज्यीक दराने येणारे मुल्यांकन यातील फरकाच्या ५०% एवढी रक्कम अधिमुल्य म्हणून वसूल करुन असा वापरातील बदल नियमित करण्यात यावा. मात्र ज्या ठिकाणी अशा भुखंडाचे वाणिज्यीक दराने येणारे मुल्यांकन रहिवास दराने येणाऱ्या मुल्यांकनापेक्षा कमी असेल त्या प्रकरणामध्ये कोणतेही अधिमुल्य आकारण्यात येऊ नये.

(५) उपरोक्त (१), (२) व (३) नुसार आकारणी करण्यात आलेली रक्कम एक रकमी भरणा करण्याची असून त्यासाठी अंमलबजावणी पूर्ण करण्याची मुदत प्रस्तुत शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून ६ महिने राहील.

(६) जे भूखंड धारक जमिनी मालकी हक्काने प्राप्त करुन घेण्यासाठी विहित मुदतीपर्यंत आकारणीची रक्कम भरणा करणार नाहीत, त्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही.

२. प्रस्तुत शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला निर्णय केवळ या प्रकरणाबाबत घेण्यात येत आला, या निर्णयाचा वापर पूर्वोदाहरण म्हणून अन्य प्रकरणात लागू होणार नाही.

३. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.९२/२०१९, दि.६.३.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०८१९४४४६५९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rahul Vijay Kulkarni

Digitally signed by Rahul Vijay Kulkarni
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=019d1a40755cacf50cb371c432c67afaec7da5aad928d966ad4270c6a4f1ac39, cn=Rahul Vijay Kulkarni
Date: 2019.03.08 19:46:47 +05'30'

(राहुल कुलकर्णी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
३) मा.मंत्री (महसूल, मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई -३२.
७) अप्पर मुख्य सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई -३२.
८) अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग) मंत्रालय, मुंबई -३२.
९) सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.
१०) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
११) विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
१२) जिल्हाधिकारी, पुणे.
१३) मा. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) मा. महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१५) महसूल व वन विभाग (ज-१), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
१६) वित्त विभाग (व्यय-९/अर्थसंकल्प-६), मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.
१७) निवडनस्ती, कार्यासन र-१२, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई -३२.

*****